ई. जागरूक दि. 17.03.25

# खून करणाऱ्या भिकाऱ्याला काही तासातच अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**लातूर/प्रतिनिधी**

१३ ते १४ मार्चच्या मध्यरात्री एका अज्ञाताने चहाटपरी समोर फुटपाथवर झोपलेल्या एका अनोळखी इसमाच्या डोक्यात दगड मारून खून केल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे अज्ञात आरोपी विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपास करून एका भिकाऱ्याला काही तासातच जेरबंद केले आहे.

घटनेनंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने काही तासातच अनोळखी मयताची ओळख पटवून तसेच गोपनीय व तांत्रिक माहितीच्याआधारे चहाच्या टपरी समोर फुटपाथवर झोपलेल्या अज्ञात इसमाच्या डोक्यात दगड मारून खून केलेल्या आरोपीला क्रीडा संकुलच्या गेट समोरून १४ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास जेरबंद केले असून देविदास शेषेराव सोनकांबळे,, राहणार खाडगाव रोड, प्रकाश नगर, चंद्रोदय कॉलनी, रोड क्रमांक, लातूर. असे त्याचे नाव आहे. दरम्यान, तो दिवसभर भिक्षा मागून खातो. दुपारी तंबाखू घेण्या देण्याच्या कारणावरून झालेल्या किरकोळ वादाचा मनात राग धरून नमूद मध्यरात्री चहाच्या टपरी समोर फुटपाथवर झोपलेला इसम नामे प्रकाश लिंबाजी भडके, वय ५८ वर्ष, खाडगाव रोड, लातूर. याच्या डोक्यात दगड घालून खून केल्याचे कबूल केले आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मारेकऱ्याला काही तासातच जेरबंद केले असून पुढील कार्यवाही करिता पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण करीत आहेत. ही कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार सिद्धश्वर जाधव, सुधीर कोळसुरे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, सूर्यकांत कलमे, प्रदीप स्वामी, विनोद चलवाड, सचिन मुंढे यांनी केली आहे.